आकाशवाणी पुणे
पुणे वृत्तांत
वेळ - संध्याकाळी ०६.०० वा.

दिनांक – ०७/०६/२०२४ वार – शुक्रवार

---

लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता संपल्यामुळे दर महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी आयोजित करण्यात येणारा विभागस्तरीय महिला लोकशाही दिन जून महिन्यापासून नियमितपणे होणार आहे, अशी माहिती महिला आणि बाल विकास विभागीय उपआयुक्त संध्या नगरकर यांनी कळविली आहे. येत्या सोमवारी विभागस्तरीय हा दिवस आयोजित करण्यात आला आहे.

दरम्यान, आचारसंहिता संपल्यानं पुण्यातल्या चार उपनिबंधक कार्यालयांच्या आधुनिकीकरणाचा मार्ग मोकळा झाला आहे. पुण्यासह राज्यातल्या ४८ उपनिबंधक कार्यालयांच्या आधुनिकीकरणासाठी पाच कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

लहान मुलांना लसीकरणानंतर ताप आल्यास गोळीऐवजी त्यांच्या वयानुसार द्रवरूप पॅरासिटामोल औषधाची मात्रा देण्यात यावी असे निर्देश केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या वतीने देण्यात आले आहेत. याबाबत पुण्यातल्या रुग्णालयांना सूचना देण्यात आल्याची माहिती पुणे जिल्हा शल्यचिकित्सक डॉक्टर नागनाथ येम्पल्ले यांनी दिली आहे.

राज्य परिवहन महामंडळाच्या प्रवाशांना युपीआय प्रणालीद्वारे तिकीट खरेदी करण्याची सुविधा एसटी ने उपलब्ध करून दिली आहे.

त्यासाठी सर्व वाहकांसाठी अॅण्ड्राईड तिकीट इश्यू मशिन्स (ETIM) नव्याने सेवेत दाखल केल्या आहेत. याला प्रवाशांनीही उत्तम प्रतिसाद दिला आहे. गेल्या पाच महिन्यात या माध्यमातून १४ लाख ३२ हजार तिकीटांची विक्री झाली असून एसटीला ३५ कोटी ८७ लाख १५ हजार रुपये उत्पन्न मिळाले आहे.

पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालय म्हणजेच पुणे आरटीओचे सहाय्यक आयुक्त संजीव भोर यांची छत्रपती संभाजीनगर इथं बदली झाली असून पुणे कार्यालयात त्यांना काल निरोप देण्यात आला. नवीन आयुक्तांची नियुक्ती होईपर्यंत पुण्याचे सहाय्यक परिवहन आयुक्त सुजित डोंगरराज यांच्याकडे तात्पुरता कार्यभार सोपवण्यात येणार आहे.

कल्याणीनगर वाहन अपघात प्रकरणी सुरेंद्र अगरवाल, बांधकाम व्यावसायिक विशाल अग्रवाल या बापलेकांसह पाच जणांवर आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे अगरवाल कुटुंबियांच्या अडचणीत वाढ झाली आहे. दरम्यान वाहन अपघात प्रकरणी अश्फाक मकानदार आणि डॉक्टर तावरे यांनी रक्त बदलण्याचा सल्ला दिल्याचे पोलिस तपासात स्पष्ट झालं आहे.

जाहिरात फलक लावताना होणाऱ्या नियमांचे उल्लंघन उघड करण्यासाठी महापालिका प्रशासनाने शहरातल्या प्रत्येक जाहिरात फलकाचे छायाचित्र आणि त्याचा अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. महापालिकेच्या आकाशचिन्ह विभागाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे.

छत्रपती संभाजीनगरला उघड झालेले गर्भलिंग निदानाचे बेकायदेशीर प्रकरण समोर आल्यानंतर तिथल्या जिल्हाधिकाऱ्यांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. सोनोग्राफी केंद्रांमध्ये गर्भलिंगनिदान कायद्याचे उल्लंघन होत असल्याचे आढळून आल्यास तसंच त्याची जाहिरात करणाऱ्यांची तक्रार आरोग्य विभागाकडे करण्याचे आवाहन आरोग्य विभागाच्या अतिरिक्त संचालक डॉक्टर रेखा गायकवाड यांनी दिली.

पुणे जिल्ह्यात बी-बियाणे, कीटकनाशकाचे विक्री परवाने काढून प्रत्यक्षात खरेदीविक्रीचा व्यवहार न करणाऱ्या १५ वितरकांचे परवाने रद्द केल्याची माहिती जिल्हा अधीक्षक संजय काठोळे यांनी दिली आहे. दोषी वितरकांवर कारवाई सुरू राहणार असल्याचंही काठोळे यांनी सांगितले.

पुणे महानगरपालिकेतल्या कर्मचारी अधिकारी यांनी कार्यालयीन वेळेचे पालन करण्याविषयी आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले यांनी नियमावली ठरवून दिली आहे. त्याचे पालन न झाल्यास कारवाई करण्याचा इशारा आयुक्तांनी दिला आहे.

कॉन्फ्लिक्ट ट्रान्सफॉर्मेशन विषयावरील दोन दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन आज करण्यात आलं. गांधी विचारांच्या माध्यमातून वैयक्तिक आणि सामाजिक जीवनातील समस्यांना कसे सामोरे जावे, याविषयी मार्गदर्शन करण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. डॉक्टर जॉन चेलादुराई आणि अमेरिकेचे हेदर क्युमिंग या अभ्यासकांनी आज मार्गदर्शन केले .

पुण्यात उद्यापासून दोन दिवसीय ज्योतिश्री अखिल भारतीय ज्योतिष अधिवेशन सुरू होणार आहे. ज्योतिषविषयक अनेक व्याख्यानं आयोजित करण्यात आली असून अनेक पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे.

पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेच्या मान्यतेने सुरू असलेल्या कॅप्टन शिवरामपंत दामले स्मृती करंडक १९ वर्षाखालील आंतरक्लब टी-२० क्रिकेट स्पर्धेत अजय चव्हाण क्रिकेट अकॅडमी संघानं विजेतेपद मिळवले. अंतिम सामन्यात अजय चव्हाण क्रिकेट ॲकॅडमी संघाने श्री समर्थ क्रिकेट ॲकॅडमीचा ६ गडी राखून पराभव केला.

पुणे आणि परिसरात आज सकाळी काही ठिकाणी पावसाच्या मध्यम सरी बरसल्या. उद्याही ढगांच्या गडगडाटासह पावसाचा इशारा पुणे वेधशाळेनं दिला आहे. आज दिवसभरात कमाल तापमान ३५ अंश तर किमान तापमान २२ पूर्णांक ९ दशांश अंश सेल्सिअस नोंदवले गेले.

तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू संध्याकाळी ०६.०० वाजता, विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.